मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२





अवकाळी पाऊस आणि सुसाट वाऱ्यामुळे जय गणेश साम्राज्य परिसरातील रस्त्याच्या बाजूला असलेले होर्डिंग कार आणि टेम्पोवर कोसळले. महापालिका प्रशासनाने अनधिकृत होर्डिंग्सवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

# मोशी येथे लोखंडी होर्डिंग कोसळले



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड शहरातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला असून मोशी येथे लोखंडी होर्डिंग कोसळले आहे. सुदैवाने यात जीवितहानी किंवा कोणीही जखमी झालेलं नाही. रस्त्याच्या कडेला असलेलं लोखंडी होर्डिंग सुदैवानं रस्त्यावर पडलं नाही. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. अद्याप हे होर्डिंग अधिकृत आहे, की अनधिकृत हे समजू शकल नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवड शहरातील मोशी येथे दुपारी साडेचारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या वादळी वाऱ्यात रस्त्यालगत असलेलं मोठं लोखंडी होर्डिंग कोसळलं. होर्डिंगखाली पार्क केलेल्या दुचाकी आणि टेम्पोचं नुकसान झालं आहे. नुकतंच, मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून १६ जणांना मृत्यू झालेला आहे. या घटनेनंतर अवघ्या होर्डिंगचा विषय समोर आला आहे. पिंपरी- चिंचवड शहरातही अनधिकृत होर्डिंग ऑडिटचे काम सुरू आहे.

# 'संजोग वाघेरे खासदार' मावळात वाघेरेंच्या विजयाचे बॅनर!

## मावळ लोकसभा निवडणुकीतील मतदानानंतर दोन्ही उमेदवारांकडून विजयाचे दावे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे, शिरुर आणि मावळमध्ये 13 मे ला मतदान पार पडलं. मतदान पार पडताच सगळ्या उमेदवारांनी आपल्या विजयाचे दावे करायला सुरुवात केली आहे. त्यात कार्यकर्त्यांकडून थेट बॅनर्सदेखील लावण्यात येत असून शुभेच्छ्या द्यायला सुरुवातदेखील झाली आहे. निकाल चार जूनला लागणार असला तरीही सेलिब्रेशन सुरु झालं आहे. मावळमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार असलेल्या संजय वाघेरेंचे मोठ-मोठे फ्लेक्स लावण्यात आले आहे. निकालापूर्वीत मावळ लोकसभेत कार्यकर्त्यांचा हा असा आततायीपणा पाहायला मिळत आहे.




मावळमध्ये श्रीरंग बारणे आणि संजोग वाघेरे यांच्यात तगडी लढत आहे. दोन्ही उमेदवारांनी प्रचारासाठी जीव तोडून मेहनत केली आहे. त्यात दोघांनीही मावळच्या हिताचे मुद्दे मांडले आणि मावळकरांना विकास करण्याचा विश्वास दर्शवला. दोघांच्या प्रचारासाठी दोन्ही पक्षातील पहिली फळी कामाला लागली होती. अनेकांनी सभा घेतल्या मोठ-मोठे रोड शो झाले. दोन्ही उमेदवारांच्या नेत्यांकडून विजयासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर मतदान पार पडलं आणि आता थेट विजयाचे बॅनर्स लागले आहेत.

मावळ लोकसभेत माझा विजय एक लाख 72 हजार 704 मतांनी होईल, असा विश्वास मविआचे उमेदवार संजोग वाघेरेंनी व्यक्त केला आहे. यासाठी त्यांनी विधानसभा निहाय मताधिक्याचा लेखाजोखा मांडला. यात सलग दोनवेळा खासदार झालेल्या श्रीरंग बारणेंना फक्त पनवेलमधून लीड मिळेल, असा दावा वाघेरेंनी केला.

# पुण्यात अनधिकृत होर्डिंग्स काढायला सुरुवात

## मुंबई होर्डिंग्सस दुर्घटनेचा धसका : सात दिवसात काढून टाकण्याचे महापालिका आयुक्तांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईतील घाटकोपर येथे वादळी पावसात होर्डिंग पडून आत्तापर्यंत 17 जणांचा मृत्यू झाला. याच पार्श्वभूमीवर पुणे महापालिका खडबडून जागी झालीय. पुणे महापालिका आयुक्त डॉ राजेंद्र भोसले यांनी अनधिकृत होर्डिंग्ज पुढील 7 दिवसात काढून टाकण्याचे आदर्श दिले आहेत. जे कारवाई करणार नाहीत त्यांना परिणाम भोगावे लागतील असा सज्जड दम सुद्धा त्यांनी अधिकाऱ्यांना दिलाय. महापालिका आयुक्त यांनी स्वतः पुण्यातील रस्त्यावर फिरून या होर्डिंग्जचा आढावा घेतला. पुण्यात जवळपास 2598 होर्डिंग्ज आहेत त्यापैकी अनेक हे नियमबाह्य आहेत त्यामुळे यावर तात्काळ कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र काही होर्डिंग उतरवत असताना कामगारांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे.



पुण्यात अनधिकृत होर्डिंग्स काढायला सुरुवात झाली आहे. पुण्यातील खंडोजी बाबा चौकातील होर्डिंग्स काढायला सुरुवात केली आहे. येत्या काही दिवसात शहराती अनेक ठिकाणी असलेली होर्डिंग्स काढण्यात येणार आहे. पुण्यातील जाहिरात होर्डिंग्ज बाबत जिल्हाधिकारी यांनी अहवाल मागितला आहे. पिंपरी चिंचवड तसेच ग्रामीण भागात लावण्यात आलेल्या होर्डिंग्सचा अहवालही मागवण्यात आला आहे. परवानगी देण्यात आलेल्या सर्व जाहिरात पालकांचे स्थापत्य विषयक लेखापरीक्षण नव्याने करून घेण्यास संबंधित जाहिरात फलक धारकाला कळवावे असं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

2500 परवानग्या आहेत. मात्र तेवढेत अनधिकृत देखील आहेत. याची सगळी चौकशी करणं सुरु आहे. अनधिकृत असेल तर थेट गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. 2598 अधिकृत होर्डिंग्स आहे. शहरात फक्त 85 अनधिकृत होर्डिंग्स आहेत. त्यात हडपसरमध्ये सगळ्यात जास्त अनधिकृत होर्डिंग्स आहेत. 2300 होर्डिंगसचं ऑडिट झालं आहे. त्यातील आतापर्यंत एकूण 1564 अनधिकृत होर्डिंग्सवर पुणे महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आली आहे. येत्या काळात होर्डिंग्सवर कारवाई करण्यात येणार आहेत. ऑडिट करण्यासाठी पुणे महापालिकेने कंबर कसली आहे.

अवकाळी पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पुण्यात अनेकदा होर्डिंग्स पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यात अनेक जणांचा जीवदेखील गेला आहे. मात्र काही काळापूर्ती या सगळ्या होर्डिंग्सवर कारवाई केली जाते. त्यानंतर कारवाई थंड होते. अजून अशा काही घटना घडल्या की पुन्हा कारवाईचा फास उगारला जातो. आता मुंबईची घटना झाल्याने पुन्हा एकदा महापालिकेला जाग आली आहे. त्यांनी थेट कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# कोल्हे की आढळराव, शिरूर लोकसभा कोण जिंकणार ?

## अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात लढत : अजित पवार आणि शरद पवारांचीही प्रतिष्ठा पणाला

**पुणे | प्रतिनिधी**

अजित पवारांनी अमोल कोल्हेंना आव्हान देत, शिरूर लोकसभेची निवडणूक प्रतिष्ठेची केली. त्यामुळं अख्ख्या राज्याचं लक्ष या मतदारसंघाकडे होतं. त्याच शिरूर लोकसभेतून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा अमोल कोल्हेंना संधी दिली. तर कोल्हेंना दुसऱ्यांदा खासदार होऊ न देण्याचा चंग बांधलेल्या अजित पवारांवर उमेदवार आयात करावा लागला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे कट्टर समर्थक आणि माजी खासदार शिवाजी आढळरावांना घड्याळाच्या चिन्हावर उतरविण्याची 'वेळ' अजित पवारांवर आली. 2019 च्या तुलनेत यंदा मतांची टक्केवारी पाच टक्क्यांनी घसरली असून त्याचा फटका कुणाला बसणार हे 4 जून रोजी स्पष्ट होणार आहे.

उमेदवार ठरल्यानंतर सुरू झाली ती आव्हान-प्रतिआव्हानांची लढाई. आधी अजित पवारांचं मग शिवाजी आढळरावांचं आव्हान कोल्हेंनी स्वीकारलं. आढळरावांच्या कंपनीशी संदर्भात केलेले आरोप आणि पुरावे सादर करण्याचा दिलेलं आव्हान, कोल्हेंनी पुराव्यानिशी जनतेसमोर मांडले आणि आता लोकसभेतून बाहेर पडण्याचा दिलेला शब्द आढळरावांनी पाळावा याची कोल्हेंनी आठवण दिली. मात्र झालेले आरोप आणि सादर केलेल्या पुराव्यांचा माझ्या कंपनीशी संबंध नसल्याचा आढळरावांनी पलटवार केला. पुढं जाऊन याचं रूपांतर सरड्याची अन पोपटाची उपमा देण्यापर्यंत गेलं. स्थानिक मुद्दे,




शेतकऱ्यांचे प्रश्न अन रखडलेला विकास हा मार्गी लावण्यासाठी नेता हवा की अभिनेता अशी फटकेबाजीही झाली.

या प्रचाराच्या रणधुमाळीनंतर प्रत्यक्षात झालेलं मतदान, हे पाहता शिरूर लोकसभेचा घाट ते दिल्ली ही शर्यत कोण जिंकणार? अमोल कोल्हे सलग दुसऱ्यांदा खासदार होणार की शिवाजी आढळराव खासदारकीचा चौकार मारणार? यावरून तर्क-वितर्क लढवले जातायेत. अशातच गेल्या लोकसभेतील आणि यंदाच्या लोकसभेतील झालेली मतदानाच्या टक्केवारीवरून ही वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत.

### गेल्यावेळी कोल्हेंना लीड मिळालं होतं त्या ठिकाणी मतदानात घट

आता या ना त्या कारणाने मतदानाकडे पाठ फिरवणाऱ्या मतदारांचा फटका कोणाला बसणार यावरून चर्चांना उधाण आलंय. तर दुसरीकडे लोकसभेतील सहा विधानसभांमध्ये 2019 साली आणि यंदा मतदानाच्या टक्केवारीत चांगलाच बदल झाला. अमोल कोल्हेंना 2019 साली जुन्नर विधानसभेतून 41 हजार 551 मतांची आघाडी मिळाली होती. पण यंदा जुन्नर विधानसभेत 6.49 टक्के मतदान कमी झालंय.

आढळरावांचा बालेकिल्ला असलेल्या आंबेगावमधून 25 हजार 697 अधिकची मतं कोल्हेंना मिळाली होती. पण यंदा इथून 7.18 टक्क्यांनी मतदान घटलंय. खेड-आळंदी विधानसभेत ही 7 हजार 446 मतांचं कोल्हेंना लीड होतं. तिथं ही 4.44 टक्क्यांची घसरण आहे.

### मतदानाची घसरलेली टक्केवारी कुणाच्या पथ्यावर

**» खरं तर मतदानाचा टक्का घसरला की चिंता ही सत्ताधाऱ्यांची वाढते असा आजवरचा अनेकांचा अभ्यास सांगतो. त्यानुसार अमोल कोल्हे सलग दुसऱ्यांदा शिरूर लोकसभेचा घाट गाजवतील आणि दिल्लीत तुतारी फुंकतील असं बहुतांश राजकीय अभ्यासकांचं मत आहे. मात्र महायुतीची मतदारसंघातील ताकद आणि त्यांनी कागदावर केलेलं बेरजेचं राजकारण सत्यात उतरलं तर मात्र शिवाजी आढळराव खासदारकीचा चौकार निश्चितपणे मारतील. त्यामुळं 25 लाख मतदारांच्या पचनी महायुतीचं की महाविकास आघाडीचं राजकारण पडलं हे 4 जूनच्या निकालातूनचं स्पष्ट होईल.**

# नागरिकांचे बळी घेणारे धोकादायक जाहिरातफलक हटवा

## आमदार आण्णा बनसोडे यांची मागणी : आयुक्त शेखर सिंह यांना दिले पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी धोकादायक जाहिरात फलक उभारण्यात आलेले आहेत. हे जाहिरात फलक चौका-चौकात, झोपडपट्टी शेजारी, दुमजली आणि परवानगी पेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग लावण्यात आलेले आहेत. त्या होर्डिंगवर तात्काळ कारवाई करुन ते जाहिरात फलक हटविण्यात यावेत, अशी मागणी पिंपरीचे आमदार आण्णा बनसोडे यांनी केली आहे.



याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना आमदार बनसोडे यांनी पत्र दिले आहे. त्या पत्रात म्हटले आहे की, घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेत निष्पाप १६ सामान्य नागरिकांचा बळी गेला आहे. ही अतिशय दुर्देवी घटना असून या घटनेचा बोध घेऊन पिंपरी चिंचवड शहरातील धोकादायक व अनधिकृत होर्डिंग (जाहिरात फलक) वर तातडीने कारवाई करायला हवी. शहरात अनेक ठिकाणी चौका-चौकात, दूकाना शेजारी, झोपडपट्टीलगत, सिग्नल, उड्डाणपूललगत, महामार्गावर शेकडो होर्डिंग आहेत. अनेक होर्डिंग दुमजली व मोठ्या साईजचे होर्डिंग आहेत. काही होर्डिंग हे पीएमपीएमएल बस स्टॉपवरील देखील लावण्यात आलेले आहेत. आता पावसाळ्याचे दिवस सुरु होणार आहेत. वादळ, वारा आणि अवकाळी पावसामुळे हे होर्डिंग पडण्याची दाट शक्यता आहे.

मागील वर्षी किवळे येथील महामार्गावर विना परवानगी असलेले होर्डिंग पडून त्या दुर्घटनेत सामान्य चार नागरिकांचा नाहक बळी गेला होता. या घटनेची आपल्या शहरात पुनरावृत्ती होऊ नये याबाबत महापालिकेने खबरदारी घेण्यात यावी, याविषयी आकाशचिन्ह व परवाना विभागाने शहरातील धोकादायक असलेल्या होर्डिंगचा सर्वे करणे आवश्यक आहे. शहरात शेकडो जाहिरात फलक अनधिकृत आहेत. पण, आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून लपवाछपवी करत आहे. दुमजली जाहिरात फलकास परवानगी नसताना अनेक जाहिरात फलक आजही दिसत आहेत. यावर कारवाई महापालिका प्रशासनाने तत्काळ करावी. महापालिकेने सामान्य नागरीकाचा जीव धोक्यात घालू नये. बिल्डरांचे अनधिकृत किऑस्क काढून टाकावेत, तसेच शहरात जाहिरात फलकामुळे कोणतीही जीवित हानी झाल्यास यास महापालिका प्रशासनाने संबंधित होर्डिंग मालक व ज्या जागा मालक यांच्यावर कठोर कारवाई तर करावीच. परंतु ज्या परवाना निरीक्षकांचे दुर्लक्ष झाल्यास संबंधित कर्मचा-याला जबाबदार धरण्यात यावे अशी मागणी बनसोडे यांनी केली आहे.

दरम्यान, महापालिका हद्दीत जाहिरातील फलक हे २० बाय २० फूटापेक्षा मोठे नसावेत. अवजड जाहिरात फलकांवर कारवाई करावी, होर्डिंग स्ट्रक्चरल ऑडीट करावे, मनपा परवानगी पेक्षा जाहिरात होर्डिंगचे स्ट्रक्चर मोठे आहे. ते जाहिरात स्ट्रक्चर तात्काळ काढावे, दुमजली होर्डिंग , पाठपूठ होर्डिंग देखील मनपाने कारवाई करावी. त्याशिवाय पीएमपीएमएल बस स्टॉप वरील लावलेले जाहिरात फलक मंजूर साईजपेक्षा अधिक साईजचे असून त्यावरही कारवाई करावी, अशीही मागणी आमदार बनसोडे यांनी केली आहे.

# प्रफुल्ल पटेल यांच्या विरोधात शरद पवार गटाचे आंदोलन

## पंतप्रधान मोदी यांना प्रफुल्ल पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप घातला होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांचा जाहीर निषेध केला आहे. वाराणसीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रफुल्ल पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप घातला होता. यावरून आता महाराष्ट्रात वाद निर्माण झाला आहे. शरद पवार गटाने पिंपरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून मूक निषेध करत प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इमरान शेख यांनी केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभा मतदारसंघामधून मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासह एनडीएतील घटक पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधान मोदींना खास भेटवस्तू देत त्यांच्या डोक्यावर जिरेटोप चढवला होता. मात्र, या जिरेटोपावरून नवीन वादाला तोंड फुटले आहे.

पिंपरीतील चौकात राष्ट्रवादी शरद पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांचा जाहीर निषेध करत मूक आंदोलन केले आहे. याप्रकरणी प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी यावेळी शरद पवार गटाने केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहेत. वारंवार भाजपकडून महापुरुषांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले जात आहेत. माजी राज्यपाल यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केलं होतं. अशी आठवण राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी करून दिली आहे.

### काय आहे जिरेटोपाचं महत्त्व?

**» 'जिरेटोप' ही शिवकालीन पगडी आहे. छत्रपती शिवाजी महाराज हा जिरेटोप डोक्यावर घालत असत. अलीकडच्या काळात एखाद्या व्यक्तीला जिरेटोप भेट दिला जातो. मात्र ही भेट देताना जिरेटोप त्याच्या हातात दिला जातो. थेट डोक्यावर ठेवला जात नाही. प्रफुल्ल पटेल यांनी हा जिरेटोप मोदींच्या हाती देण्याऐवजी डोक्यावर ठेवला. त्यामुळं वाद निर्माण झाला. पटेल यांनी त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.**

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनंही प्रफुल्ल पटेल यांना घेरलं. 'महायुती दिल्लीच्या तख्तापुढं इतकी लाचार झाली आहे की, महाराष्ट्राची प्रतिमाच खड्डयात घालण्याचं काम या नेत्यांकडून होतंय. महाराजांचा अवमान करणाऱ्या या महायुतीला, भाजपला धडा शिकवल्याशिवाय महाराष्ट्राची स्वाभिमानी जनता शांत बसणार नाही, असा हल्ला शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं चढवला.

वातावरण चिघळल्याचं दिसताच प्रफुल्ल पटेल यांनी आज 'एक्स'वर पोस्ट करून त्यांची भूमिका मांडली. 'हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज हे आमचं आराध्य दैवत आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या आदर्शांवर व लोककल्याणाच्या मार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान होईल, अशी कोणतीही गोष्ट कधी मनातही येऊ शकत नाही. यापुढं काळजी घेऊ,' असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

# इंदापूर तालुक्यात 21 गावांना टँकरने पाणी

## 21 गावांना दररोज 43 टँकरने 117 खेपा : आठ गावांचे मागणी प्रस्ताव प्रतिक्षेत

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस वाढू लागली असल्याने गावांगावांतून टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी वाढू लागली आहे. सध्या तालुक्यातील 21 गावांना दररोज 43 टँकरने 117 खेपा पाणी पुरविले जात आहे. तर आठ गावांचे टँकर मागणी प्रस्ताव मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत.

सध्या सोलापूरला उजनीचे पाणी पिण्यासाठी नदीतून सोडण्यात आल्याने, टंचाईची स्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवाय टँकर भरण्यासाठीच्या स्त्रोतांची पाणी पातळी घटली जाणार असून, पाण्याचे स्त्रोत मिळविण्याचे नवे आव्हान निर्माण होणार असल्याचे बोलले जात आहे. इंदापूर तालुक्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास, तालुक्याच्या एका बाजूला निरा नदी, दुसऱ्या बाजूला भिमा नदी आहे. दोन्ही नद्यांमध्ये निरा डावा कालवा व खडकवासला कालवा आहे.

मात्र तालुक्यातील ठराविक पट्टा कायम अवर्षण प्रवण क्षेत्र राहिला आहे. या पट्ट्यात पावसाचे प्रमाण कमी असते. या भागातून गेलेल्या खडकवासला कालव्यामुळे येथे हरितक्रांती घडण्याची आशा होती. मात्र अलीकडच्या काळामध्ये कालव्याचे बेभरवशी झालेले आवर्तन, या भागाला दुष्काळाच्या खाईत लोटण्यास कारणीभूत ठरले आहे.

सध्या या भागातील काही गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन 2018मध्ये टंचाईची स्थिती निर्माण झाल्यानंतर तालुक्यात 62 टँकरने पाणी पुरवठा केला जात होता. यंदाही पावसाचे प्रमाण कमी असल्याने, टँकरची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुणे जिल्ह्यात पाणीटंचाईच्या तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. जिल्ह्यातील दोन लाख २३ हजार १५ लोकसंख्याही टँकरच्या पाण्यावर अवलंबून असून, सद्यःस्थितीत ११७ गावे आणि ७६२ वाड्या-वस्त्यांना १४८ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यातील काही गावांना गेल्या वर्षभरापासून बारमाही पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. यामुळे काही गावांना गेल्या वर्षभरापासून टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.



### उजनीलगतच्या गावांतूनही होणार टँकरची मागणी

» उजनीलगतच्या गावांतूनही होणार टँकरची मागणी होत आहे. उजनी धरणामध्ये तालुक्यातील 28 गावे बुडीत तर 5 गावे बाधित झालेली आहेत. या गावांचे पुनर्वसन झाल्यानंतर त्यांना उजनीच्या पाण्याचा हक्काचा व कायमचा स्त्रोत आहे. यंदा मात्र दुष्काळाची टंचाई तीव्र असल्याने धरणग्रस्तांचे हक्काचे पाणी दुरावले आहे. यातच नदीतून पाणी सोडल्याने धरणाच्या पाण्याने तळ गाठ गाठला आहे. परिणामी गावागावांच्या पाणी पुरवठा योजनांची पाणी पातळी खालावली आहे. येत्या काही दिवसांत उजनीलगतच्या गावांतूनही टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी होत आहे.

### जल जीवन मिशनतंर्गत कामे पुर्णत्वाच्या प्रतिक्षेत

» इंदापूर तालुक्यात जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत 117 ग्रामपंचायतींना पाणी पुरवठ्यासाठी नवीन योजना मंजूर झाल्या आहेत. यापैकी 19 गावांच्या पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत. तर उर्वरित गावांच्या पाणी योजनांचे काम अद्यापही सुरु आहे. जिल्हा परिषदेमार्फत या गावांच्या पाणी योजनांसाठी सुमारे 220 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून 29 गावांतील पाणी योजनांसाठी सुमारे 550 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. असे एकूण 770 कोटी रुपयांच्या पाणी योजनांच्या माध्यमातून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचे प्रयत्न आहेत; मात्र योजनांचे काम मार्गी लागण्याच्या प्रतिक्षेत अनेक ग्रामपंचायती आहेत.

# भोर शहरामध्ये वर्दळीच्या चौकात अनधिकृत होर्डिंग

## धोकादायक होर्डिंगची भोर नगरपालिकडे कोणत्याही प्रकारे परवानगी घेतलेली नाही

**पुणे | प्रतिनिधी**

भोर शहरासह एसटी स्टँडमध्ये १७ ठिकाणी अनधिकृत होर्डिंग असून ही धोकादायक होर्डिंगची भोर नगरपालिकडे कोणत्याही प्रकारे परवानगी घेतलेली नाही. स्वतःच भोर नगरपालिका जागेचे मालक झाल्याचे चित्र दिसत आहे. अनेक होर्डिंग्जच्या खाली अनेकांचे धोकादायक पध्दती व्यवसाय सुरु असल्यामुळे मुंबई येथील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भोर शहरातील होर्डिंगचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

भोर शहरातील चौपाटी, रामबाग, एसटी स्टँडजवळील रस्ते आणि महाड नाक्याजवळ लोखंडी होर्डिंग विनापरवाना लटकले आहेत. परंतु भोर नगर परिषद संबंधित



होर्डिंग्ज मालकांना दरवर्षी नोटीसा देत असून देखील परवानगी घेण्यात टाळाटाळ करीत आहे. एखादा अपघात झाल्यावर त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अशा सर्व होर्डिंगधारकांच्या परवानगीची चौकशी सुरू केली आहे. सार्वजनिक व खासगी ठिकाणी असलेल्या सर्व होर्डिंगसाठी नगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. अनधिकृत असणाऱ्या होर्डिंग्जच्या जाहिरातीच्या माध्यमातून लाखो रुपये मिळवत असताना देखील त्याकडे संबंधित मालक दुर्लक्ष करीत आहेत.

एस टी स्टँड, बाजार पेठ, चौपाटी याठिकाणी होर्डिंग्जच्या खाली अनेकांचे लहान मोठे व्यवसाय सुरु आहेत. परंतु होर्डिंग्जचे टेक्निकल ऑडीट झाले की नाही, हे व्यापाऱ्यांनी पाहणे गरजेचे आहे. तरी देखील जीव मुठीत धरुन धोकादायक पध्दतीने व्यवसाय करीत आहेत.

> “ भोर शहरात ७ तर एस टी स्टँड परिसरात १० अनाधिकृत होर्डिंग्ज असून त्यांना भोर नगरपालिकेने नोटीसा बजावल्या आहेत. १० दिवसांत टेक्निकल ऑडीट करुन घेऊन तसा रिपोर्ट नगरपालिकेला सादर करावा. अन्यथा नोटीसाच्या मुदतीनंतर संबधित होर्डिंग्जवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी येणारा खर्च त्यांच्याकडून वसूल करण्यात येणार आहे.
>
> **- श्रीराम पवार, मुख्याधिकारी, नगरपरिषद, भोर**